Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-3 | Issue-3 | Sept-2013
Available online at www.lbp.world

GRT

# शिरूर तालुक्यातील शेतकरी उठाव (1875-76)

**प्रा. हरिदास शंकर जाधव**
इतिहास विभाग, चां.ता.बोरा महाविद्यालय शिरूर जि.पुणे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी** :

पुणे जिल्हयातील पूर्वेकडील भाग म्हणजे शिरूर तालुका होय. या तालुक्याच्या पष्चिमेला भीमा व वेळ या नद्या पूर्वेस घोडनदी व पारनेर आणि श्रीगोंदा हे तालुके उत्तरेस खेड व आंबेगाव हे तालुके तर दक्षिणेस दौंड व पुरंदर हे तालुके आहेत.

शिरूर तालुक्याच्या भूमीत प्रागितिहासिक काळापासून ते आधुनिक काळापर्यंत अनेक ऐतिहासिक संदर्भ आपल्याला मिळतात. तालुक्यातील घोडनदीच्या काठी इनामगांव येथे अशमयुगीन मानवाची हत्यारे व प्राण्यांचे जीवाष्म मिळाले आहेत.याशिवाय सर्वात महत्वाचे म्हणजे महाराष्ट्रातील शेतक-यांच्या आद्य वसाहतीचे ताम्रपाशाणयुगीन अवशेश इनामगांव येथे मिळाल्याने शिरूर तालुक्याचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा सुमारे 3500 हजार वर्षं मागे जातो. 17 व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात स्वराज्याची स्थापना केली. महाराजांच्या या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात शिरूर परीसरातील अनेकांनी आपले योगदान दिले. छत्रपती शिवाजी महाराजांचे सेनापती नेताजी पालकर यांचे मूळ गाव तांदळी हे शिरूर तालुक्यात असून आजही नेताजींचा भग्नावस्थेतील वाडा शिवकालीन इतिहासाची साक्ष देतो. विशेषतः शिवाजी महाराजांवर अफजलखानाच्या स्वारीचे संकट आले असताना तळेगाव येथील ढमढेरे सरदारांनी शिवाजी महाराजांच्या भेटीकरीता राजगडाकडे जाणा-या कान्होजी जेधे यांच्या कबिल्यास तळेगांव येथे आश्रय दिला होता. याच ढमढेरे घराण्यातील सरदारांनी पुढे पेशव्यांच्या काळातही पानिपतच्या युध्दापर्यंत आपले योगदान दिल्याचे दिसून येते. पेशवे काळातील प्रसिध्द मराठा सरदार घराणे पवार यांची जहागीरही शिरूर तालुक्यातील मलठण व कवठे येथे होती. या पवार सरदारांनी पानिपतमध्ये मोठा पराक्रम केला होता. थोरल्या माधवराव पेशव्यांनी याच परीसरात असलेल्या जवळा गावची जहागीर सोमवंशी घराण्याला दिली होती.

ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या कालखंडात शिरूर तालुक्याला लष्करीदृश्टया अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले. ब्रिटिशांनी 1802 मध्ये मुधोजी घोरपडे यांना दोन हजार घोडेस्वाराचा रिसाला शिरूर येथे ठेवण्याची सनद दिली.जोपर्यंत ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता भारतावर राहील तोपर्यंत शिरूर येथे घोरपडयांचा रिसाला राहणार होता.घोरपडयांच्या या रिसाल्यामुळे शिरूर तालुका व परीसराला लष्करीदृश्टया महत्व प्राप्त झाले. येथील परीसराच्या सामाजिक जीवनावर या

रिसाल्याच्या मोठा प्रभाव पडल्याने तरुणांना नोकरीची व मर्दुमकी गाजविण्याची एक सुवर्णसंधी प्राप्त झाली. 1818 साली पेशवाईचा अस्त झाला यासाठी ब्रिटिशांनी शिरूर येथील लष्कराचा मोठया कुशलतेने वापर करुन घेतला. यानंतरच्या काळात शिरूर येथे ब्रिटीश लष्करी छावणीची स्थापना झाली.[1] कॅप्टन स्टा ॅटन यांनी कोरेगांव येथील लढाईसाठी कर्नल बर यांच्या आदेषानुसार पहिल्या बॉम्बे नेटिव्ह इन्फंट्रीपैकी दुसरी बटालियन, दोन तोफा आणि 250 घोडेस्वार नेहल्याची नोंद मिळते.[2]

**कर्डे: 1875 च्या शेतकरी उठावाचे उगमस्थान:**

शिरूर तालुक्यातील ही लढाऊ प्रवृत्ती पुढे ब्रिटीश राजवटी विरुध्द विविध आंदोलनात प्रकर्शाने दिसून येते. 1857 साली ब्रिटीश विरोधी भारतात मोठा उठाव झाला. हा उठाव म्हणजे भारतीयांचे पहिले स्वातंत्र्य युध्द असे स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणतात. या उठावाने ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता संपुस्टात येऊन भारताची सत्ता सूत्रे ब्रिटीश पार्लमेंटकडे गेली. तरी शेतकरी विषयक धोरणांमध्ये फारसा बदल झाला नाही.शासनाच्या धोरणांमुळे शेतकरी कर्जबाजारी होऊ लागले. धनको वर्गात सर्वात द्दश्ट होता तो सावकार. कारण त्याला कायद्याचे संरक्षण होते. त्याने दिलेल्या कर्जाच्या सुरक्षिततेसाठी त्याला तारण म्हणून जमीन मिळे. सावकारांच्या या शोषक भूमिकेविषयी मार्क था ॅर्नहिल लिहितो, "शासनाच्या कायद्यामुळे बनावट कागदपत्रे आणि खोटे साक्षीदार या गोष्टी त्यांच्या खतावण्या आणि ताब्यातील वस्तू इतक्याच त्यांच्या यशाला उपयुक्त ठरल्या अशा अनुकूल परिस्थितीमुळे सावकाराचा शोषक लोभीपणा पोसला गेला.[3] दरवर्शी न्यायालयाच्या आदेशानुसार अनेक मालमत्तांचा लिलाव करण्यात येई. आश्चर्याची गोष्ट अशी की, कर्जफेड न झाल्यामुळे असे लिलाव होत होते. पण कर्जाची रक्कम वर्षानुवर्ष शेतक-याने व्याजासह फेडूनही अज्ञान व अशिक्षितपणामुळे शेतक-यांन जमिनीची मालकी गमवावी लागली. ब्रिटीश शासनाच्या प्रारंभीच्या काही काळात अशा अनेक मालमत्तांचा लिलाव झाल्यामुळे भारतीय समाजात प्रचंड उलथापालथ झाली असा निष्कर्ष सर सईद अहमद खान अखेरीस काढताना दिसतात.[4] म्हणून शासनाच्या या सावकारधार्जिण्या धोरणामुळे भारतात अनेक ठिकाणी लहान-मोठे उठाव झाले. या शेतकरी उठावांचा प्रारंभ शिरूर तालुक्यातील कर्डे गावातून झालेला आहे. इ.सन 1875-76 मध्ये महाराष्ट्रातील पुणे व अहमदनगर जिल्हयांमध्ये दुष्काळ पडलेला होता. या दुष्काळ निवारण्याच्या संदर्भात ब्रिटीश शासनाचे कोणतेही ठोस धोरण नसल्याने या भागातील लोकांना मदत देण्याचे गव्हर्नर जनरल सर रिचर्ड टेंपल याने नाकारले. अगोदरच सावकाराच्या कर्जामुळे शेतकरी अडचणीत सापडलेला होता. एका बाजूला शासनाचे दुष्काळा संदर्भातील उदासिन धोरण व दुस-या बाजूला सावकारी कर्जाचे वाढते ओझे अशा दुहेरी स्थितीमुळे शेतक-यांची अवस्था अतिशय दयनीय झाली.[5] त्यामुळे अशा शेतक-यांनी सावकारांच्या विरोधी आंदोलन उभे केले. या आंदोलनालाच 'दख्खनचे दंगे' (Deccan Riots) असे संबोधले जाते. या संदर्भात **Report of the Commission Appointed in India** च्या अहवालात खालील नोंद मिळते. "The First open indication of the spirit of hostility against the Marwari money lender-which led to the riots was shown by the inhabitants of the village of Kardeh ,in the Sirur Taluka of the Poona collectorate , at the end of 1874.[6] याच घटनेच्या संदर्भात 27 जानेवारी 1875 च्या ज्ञानचक्षू या वर्तमानपत्राच्या अंकात प्रसिध्द झालेल्या एका अनामिकाच्या पत्रातून पुढील माहिती उपलब्ध होते. *"The village of Kardeh in Taluka Sirur, originaly belong to Raste. One Babasaheb*

*Deshmukh Live in this village. One of his Sowkars, by a name Kalooram Marwari, obtained decrees against him from the court at Talegaon, and insatisfaction thereof put the Deshmukh's house for sale by a public auction and purchased it himself for Rs. 150. In December 1874 the plaintiff commenced to pull down the house, when the defendant requested him not to do so, and promised to the debits at his Convenience . Defendant also agreed to pay rent for the house during its occupancy, but the plaintiff did not listen to his proposal and refused to put a stop to the pulling down of his house. Defendant took a heart these proceedings of the sowkar, and he collected together the village ryots and resolved that as the Marwaris have commenced to run them, it would be better neither to borrow from them nor to serve them or purchase anything from them in future . This unanimous resolution of the villagers put the Marwaris Sachiram Pratap, Shivram and one or to others to the greatest inconvenience for want of servants & Co. They therefore proposed to remove themselves to Sirur with the aid of the Police by 5th January 1875. When the Marwari's bad loaded their carts with their goods and things the villagers submitted a petition to the Sircar (Government ) that is they had given grain to the Marwaris they should not be allowed to live the village until the Government assessment has been paid by them.*[7]

**उठावाची व्याप्तीः**

या आंदोलनाचा प्रारंभ शिरूर तालुक्यातील कर्डे या गावी झाला व थोडयाच अवधीत याचे लोण पुणे व अहमदनगर जिल्हयातील अनेक गावांमध्ये पोहचले. यामध्ये भिमथडी तालुक्यातील 18 गावे, शिरूर तालुक्यातील 10 गावे, इंदापूर तालुक्यातील 1, हवेली तालुक्यातील 3,पारनेर तालुक्यातील 6 श्रीगोंदा तालुक्यातील 11,नगर तालुक्यातील 4 व कर्जत तालुक्यातील 1 अशा पुणे व अहमदनगर जिल्हयातील 53 गावातील शेतक-यांनी या उठावात भाग घेतलेला दिसतो. या 53 गावातील उठावात सहभाग घेतलेल्या अनेक लोकांची धरपकड ब्रिटीश षासनाने केली. यापैकी पुणे जिल्हयातून 559 लोकांना पकडण्यात येऊन 301 लोकांना दोशी ठरवून विविध मुदतीच्या शिक्षा देण्यात आल्या, तर 258 लोकांना सोडण्यात आले याशिवाय अहमदनगरजिल्हयातून 392 लोकांना पकडण्यात आले त्यापैकी 200 लोकांना शिक्षा दिल्या तर 192 लोकांना सोडून देण्यात आले.[8] उठावात सहभागी झालेले शिरूर तालुक्यातील इतर गावातील शेतकरीः[9]

| अ.क्र | गावाचे नाव | शेतक-याचे नाव | सावकाराचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | सोनेसांगवी | काशी उर्फ गेनू कुणबी | गुलाबचंद |
| 2 | सोनेसांगवी | पांडू उर्फ लक्ष्मण | दयाराम गुजर |
| 3 | सोनेसांगवी | हरि उर्फ सखाराम | भैरु शिंदे मलठण |
| 4 | सोनेसांगवी | रोकडी उर्फ नाना | --------------------- |
| 5 | सोनेसांगवी | कोंडू उर्फ कोशाबा | दयाराम गुजर व भैरु शिंदे मलठण |
| 6 | सोनेसांगवी | चिमा उर्फ मालजीबुवा | दयाराम गुजर,मलठण |
| 7 | सोनेसांगवी | गंगाराम बापूजी | शिवराम मारवाडी,मलठण |
| 8 | सोनेसांगवी | गेनू उर्फ संभू | रोडी पटेल,मारवाडी |
| 9 | सोनेसांगवी | काशिराम आप्पाजी लोहार | सुगन गुजर |
| 10 | निमगाव | रामजी केशोजी | रोका कुणबी गणेगाव |
| 11 | लिंबगाव | हैबती उर्फ बापूजी कुणबी | विनायकराव गोखले |
| 12 | लिंबगाव | नाना उर्फ तबाजी | भिकू नेमचंद मारवाडी |
| 13 | लिंबगाव | तुकाराम उर्फ बाळाजी महाडिक | भिकू नेमचंद मारवाडी |

***सदर सारणीतील शेतक-यांची नावे Deccan Riots Commission, Appendix B मधून संकलित करण्यात आली आहेत.***

अशा रीतीने ब्रिटीश सरकारचे सावकार धार्जिणे धोरणे व सावकारांनी शेतक-यांची केलेली पिळवणूक या मूख्य कारणांमुळे 1875 चा हा शेतकरी उठाव घडून आला. या उठावाचा केंद्रबिंदू प्रामुख्याने सध्याचा शिरूर तालुका व परीसरातील पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, दौंड, बारामती, इंदापूर इ. तालुके असल्याचे दिसून येते. या उठावाचा सर्वात महत्वाचा परिणाम म्हणजे ब्रिटीश सरकारला ताबडतोब Deccan Agriculturalist Relief Act या कायद्याची अंमलबजावणी करावी लागली.

## संदर्भ व तळटिपाः

1. Moledina M.H, History of Poona Cantonment, 1818-1953, Published under the Auspices of the Poona Kirkee Cantonments Citizens' Association P.1
2. परांजपे शि..म, मराठयांच्या लढायांचा इतिहास, प्रकाशक शंकर नरहर जोशी ,पुणे, 1934 आवृत्ती दुसरी, पृ. 60
3. जोशी पी.सी (संपा.), कोठेकर शांता (अनु.), 1857 चा उठाव, पिपल्स पब्लिषींग हाऊस, (मराठी अनु.), नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, प्रथम प्रकाशन, 2013, पृ.11
4. कित्ता., पृ. 19
5. फडतरे (डॉ.), भूषण गोविंद, भारतीय स्वातंत्र्य लढयात पुणे जिल्हयाचे योगदान, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती, 15 ऑगस्ट, 2013, पृ. 17

6. Report of the Commission appointed in India to Inquiry into "The Causes of the Riots Which took place in the Year 1875, in the Poona and Ahmednagar Districts of the Bombay Presidency" London, Printed by George Edward Eyle and William Spottiswood , 1878 P.1
7. तत्रैव.
8. Report of the Commission appointed in India, पृ. 2 व 3
9. Deccan Riots Commission, Appendix B, Action of the ------ Civil Courts and on the Ricultural Debtor , Preliminary Digest of Evidences, Government Central Press, Bombay, 1876,